
R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार




वर्ष ५६ वे, अंक १२वा, मुंबई । फेब्रुवारी २०२४
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 56, Issue : 12, Mumbai I February 2024
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50



पद्मभूषण माननीय श्री. राजदत्त यांच्या निवासस्थानी मध्यवर्ती मंडळातर्फे अभिष्टचिंतन...
सोबत श्री. प्रभाकर कुलकर्णी, आनंद कुलकर्णी आणि अरुण पुराणिक



देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

**समाचार**

वर्ष ५६वे, अंक १२वा,
फेब्रुवारी २०२४
(फक्त सभासदांसाठी)

**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९

अंकातील मजकूराशी मंडळ
सहमत असेलच असे नाही

दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई-मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in

## दि. १९ ते २१ जानेवारी २०२४ मध्यवर्ती मंडळ आयोजित गृहोपयोगी वस्तूंचे प्रदर्शन व विक्री प्रदर्शन सोहळा





श्री. संजीव ब्रह्मे, श्री. उदय तारदाळकर, श्री. रवींद्र आवटी, सौ. उत्तरा मोने,
सौ. ऋता कळमणकर, श्री. विलास जोशी, श्री. प्रभाकर कुलकर्णी



प्रदर्शन आयोजनाची महत्त्वपूर्ण जबाबदारी –
श्रीमती अश्विनी नारविलकर, सौ. ज्योती जोशी, सौ. रोहिणी तडवळकर,
सौ. माधवी सरदेशमुख




चित्रपट निर्माती सौ. मंजिरी सुबोध भावे आणि उद्योजिका सौ. श्वेता इनामदार यांची प्रदर्शनास भेट



चित्रपट अभिनेत्री सविता मालपेकर आणि श्री. रवींद्र आवटी यांची प्रदर्शनास भेट




HD FIRE PROTECT
Protecting what matters most to you
World-Class Fire Fighting Products
and Suppression Systems
Serving
75+ Countries Worldwide
30+ YEARS
OF MANUFACTURING EXCELLENCE
HD FIRE PROTECT PVT. LTD.
Corporate Headquarters: D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604, India
Tel: +(91) 22 21582600 | Fax: +(91) 22 21582602 | Email: info@hdfire.com
VdS CE
www.hdfire.com | @HdFireProtectPvtLtd | @hd-fire-protect | @TheHdfire

# संपादकीय

१८ फेब्रुवारी २०२४ रोजी, सेवा सदन प्रशाला, सरस्वती चौक, सोलापूर येथे अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या संलग्न संस्थांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची संयुक्त सभा आयोजित करण्यात आली आहे. संलग्न संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचा परिचय वाढून या संस्था एकमेकांना पूरक कशा बनतील या दृष्टीने धोरण आखणे, संलग्न संस्थांच्या गेल्या तीन वर्षांच्या कामगिरीचा आढावा घेणे, मध्यवर्ती मंडळ व या संलग्न संस्था एकत्रितपणे कशा काम करू शकतील व संयुक्तरित्या कुठले उपक्रम आपल्याला राबवता येतील यावर विचार विनिमय करणे, संलग्न संस्थांच्या व मध्यवर्ती मंडळाच्या सभासद संकेत गुणात्मक वाढ व्हावी या दृष्टिकोनातून काही योजना आखणे तसेच माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने येणाऱ्या ऐनवेळीच्या उपस्थित होणाऱ्या प्रश्नावर चर्चा करणे अशा प्रकारचा कार्यक्रम आखण्यात आला आहे. या संलग्न संस्थांच्या बैठकीत अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या वतीने देशभरातील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने त्याला विविध माध्यमाद्वारे मदत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. आज सर्वत्र इतरही ज्ञाती संघटना स्थापन होत आहेत. समाज हित साधण्याचे प्रयत्नही सुरू आहेत. अशावेळी जर आपण आपला समाज एकत्र आणला नाही तर ती फार मोठी चूक ठरेल. कारण आपला समाज हा खऱ्या अर्थाने अल्पसंख्य समाज आहे. खेड्यात राहणाऱ्या ब्राह्मणाला प्रचंड विरोधाला आणि समस्यांना सामोरे जावे लागत आहे. उत्पन्नाचे साधन मर्यादित राहिल्यामुळे जगावे कसे हा प्रश्न, मुलाबाळांचे शिक्षण, नोकऱ्या,धंदे आदी समस्यामध्ये ब्राह्मण वर्ग गुरफटत चालला आहे. अशावेळी व्यवस्थेला सामोरे जाणाऱ्या देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाज बांधवास मदतीचा हात दयावयास हवा. व खऱ्या अर्थाने त्यासाठीचा मूलभूत पायाच करावा लागेल.

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या वतीने शैक्षणिक मदतीचे काम अव्याहतपणे सुरूच आहे. परंतु त्याचा लाभ समाजातील कितीजण घेतात? कुठपर्यंत या शैक्षणिक कार्याची माहिती पोहोचली आहे? हा विचार खऱ्या अर्थाने आता करावयास हवा. हे शैक्षणिक मदतीचे कार्य केवळ मध्यवर्ती संघटनेमार्फतच न करता स्थानिक व संलग्न संस्थामार्फत जास्तीत जास्त कसे करता येईल याचाही विचार करणे आवश्यक आहे.

आज समाजासमोर सर्वात मोठी समस्या कोणती असेल तर ती विवाह समस्या. यावरही सर्वंकष विचार करून संलग्न संस्थांच्या मदतीने देशभर प्रबोधनात्मक व रचनात्मक कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे. आजपर्यंत मध्यवर्ती मंडळांनी हजारो तरुणांना शैक्षणिक मदत केली आहे. अशा तरुणांशी पुन्हा संपर्क साधून आवाहन करणे, व त्यामधून एक नवा निधी या कामाकरता उभा राहू शकेल. अनेक तरुण उद्योजक, वेगवेगळ्या हुद्द्यावर आपली मंडळी कार्यरत आहेत. जर या सर्वांशी मध्यवर्ती मंडळ व संलग्न संस्था यांनी संपर्क साधला तर ज्ञातीतील मुलांना व्यवसाय देखील मिळवून देता येईल आणि उद्योगधंद्याला मदतही करता येईल. एखादा समाजबांधव अडचणीत आला, एखादा दुर्धर, दुःखद प्रसंग त्याच्यावर आला तर संस्था संघटना त्याला हातभार लावून दिलासा देणार का? आपत्ती व अडचणीच्या वेळी आपल्या संस्था त्याच्या पाठीशी उभ्या राहिल्या तर जास्तीत जास्त समाजबांधव आपल्याशी जोडले जातील.

आपला समाज गुणांने बराच मोठा आहे. समाजातील अनेक मंडळी मोठ्या पदावर कार्य करीत आहेत. परंतु ठिकठिकाणी ती विखुरलेली आहेत. समाजातील अनेक मंडळी डॉक्टर्स, इंजिनियर्स, बिल्डर, प्राध्यापक, शिक्षक, सैनिक, खेळाडू, व्यापारी, उच्च पदावर कार्य करणारी सरकारी अधिकारी, वकील, समाजिक व

राजकीय कार्यकर्ते अशी अनेक थोर मंडळी आहेत. ही सर्व मंडळी आपापल्या कार्यक्षेत्रात हुशार गुणी, नामवंत आहेत. अशा सर्व मंडळींचा मार्गदर्शनाचा लाभ आपण घेतला पाहिजे. त्यांच्याशी संपर्क नसल्यामुळे मदत घेऊ शकत नाही. अशा सर्व मान्यवरांची संलग्न संस्थांच्या मदतीने अशा मंडळीची सूची तयार करून या सर्व मान्यवरांना आपल्या संस्थेच्या कार्यात जोडले गेले पाहिजे. संलग्न संस्थांचे अशाच प्रकारचे मेळावे घेऊन समाज बांधवांना एकत्रित करावे लागेल हीच खरी काळाची गरज आहे.

**– मिलिंद सरदेशमुख**

## समर्थ संप्रदाय व अयोध्या एक अतूट नातं

**स. भ. मोहनबुवा रामदासी (मो. : ९१४६८५५६९१)**

अयोध्या हे एक ऐतिहासिक शहर आहे ज्याला हिंदूंनी अत्यंत महत्त्व दिलं आहे. या शहराचे महत्त्व मुख्यतः राम मंदिराच्या स्थानाच्या प्राचीनत्वात, वानर सेनेच्या संघर्षात आणि हिंदू धर्माच्या महत्त्वात आहे. अयोध्येतील राम मंदिर हे हिंदूंच्या अनेक मान्यतेंचा आधार आहे. रामाची आराधना आणि त्याच्या जन्मस्थळाचा मान हे अनेक हिंदूंसाठी पावित्र्याचे एक महत्त्वपूर्ण केंद्र आहे. हिंदू धर्मात राम हे एक महत्त्वाचे दैवत आहे. त्यांची कथा, आदर्शे आणि मानवी गुणधर्मांचे पालन करण्याची मान्यता हिंदू धर्मात अत्यंत महत्त्वाची आहे. भारतातील लहानसहान मुलांपासून ते थोरामोठ्यांच्या तोंडी रामायणाची कथा असते. अयोध्या हे स्थान हिंदू साम्राज्य, संस्कृती, आणि हिंदू धर्माचे महत्त्वाचे स्थळ आहे, ज्याचा हिंदूंनी अत्यंत आदर केला आहे आणि त्याचं महत्त्व आजही उच्च आहे. आज अयोध्येत बांधले जाणारे राम मंदिर ही प्रत्येक भारतीयासाठी व विशेषतः हिंदूंसाठी एक अभिमानाची व आनंदाची बाब आहे.

महाराष्ट्रात सुमारे ४०० वर्षांपूर्वी समाजात विठ्ठल हे दैवत प्रचलीत असताना समर्थांनी समाज मनातील सामर्थ्य व पुरुषार्थ जागवण्यासाठी श्री.राम हे दैवत समाज मनामधे रुजवले. अयोध्या हे समर्थ संप्रदायाचं म्हणजे स्वरुप संप्रदायाचं मूळ पीठ आहे. यवनी अत्याचाराचा परिणाम अयोध्येवर झालेला समर्थांनी स्वतः पाहिलेला आहे म्हणूनच समर्थांनी अयोध्येत शरयू तीरावरच मारुतीचीही स्थापना केलेली आहे. त्यामुळेच समर्थ संप्रदाय व अयोध्या यांचं एक अतूट नातं आहे व समर्थ संप्रदाय एका वेगळ्याच नाळेने अयोध्येशी जोडलेला आहे.

**छत्रसुखासनी अयोद्धेचा राजा। नांदतसे माझा मायबाप। माझा माय बाप त्रैलोकी समर्थ। सर्व मनोरथ पूर्ण करी। पूर्ण प्रतापाचा कैवारी देवाचा। नाथ अनाथांचा स्वामी माझा। स्वामी माझा राम। योगीया विश्राम। सापडले वर्म थोर भाग्य। थोर भाग्य ज्याचे राम ज्याचे कुळी। संकटी सांभाळी। भावबळे।**

हा समर्थांचा अभंग प्रसिद्ध आहे. अयोध्या संघर्ष आणि समर्थ विचारांचे जागरण होय. अयोध्येच्या संघर्षाबरोबरच समर्थांनी समाजातील मनामनात पुरुषार्थरूपाने राम जागवला आहे. हे त्या काळात खूप आवश्यक होतं. भयभीत झालेला समाज अजमेर सारख्या मदरशांकडे धाव घेत होता. तिथे त्यांची प्रचंड लूटच होत असे आणि भोळ्या-भाबड्या समाजाला फसवले जात होते. अशा कालखंडात जय जय रघुवीर समर्थ ही गर्जना समाजासाठी संजीवनीच ठरली.भक्ती व शक्तीचे अधिष्ठान असणारा हा संप्रदाय अयोध्या व प्रभू श्री.रामांनी दर्शवलेल्या मार्गावर न्याय, निती व धर्मावर चालणारा आहे. या मार्गावर संघर्ष आहे. सत्याची बाजू असणाऱ्यांना हा संघर्ष प्रभू श्री.रामांच्या कालखंडापासून चुकलेला नाही. याच मार्गावर लढा देत राहिल्यामुळेच आज असंख्य रामभक्तांचे स्वप्न साकार झाले आहे.

# संलग्न संस्था वृत्त

**मुंबई :** अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळातर्फे गृहोपयोगी वस्तुंचे प्रदर्शन व विक्री शिबीराचे दिनांक १९, २० व २१ जानेवारी २०२४ रोजी लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माटुंगा येथील सभागृहात आयोजन करण्यात आले होते. या गृहोपयोगी वस्तुंच्या शिबीराचे उद्घाटन प्रसिद्ध लेखक श्री. रविंद्र आवटी, दादर सांस्कृतिक मंचाच्या प्रमुख सौ. उत्तरा मोने, बी.बी.एन.जी. च्या पदाधिकारी सौ. स्वेता इनामदार यांच्या शुभहस्ते संस्थेचे अध्यक्ष श्री. विलास जोशी, कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी तसेच सौ. रोहिणी तडवळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या गृहोपयोगी प्रदर्शनामध्ये एकूण सुमारे ४० महिला उद्योजकांनी भाग घेतला होता. यामध्ये पैठणीपासून सोलापूरच्या प्रसिद्ध शेंगदाणा चटणीपर्यंत विविध दालने ग्राहकांसाठी उघडण्यात आली होती. दादर, माटुंगासह मुंबईतील अनेक सभासद तसेच मान्यवरांनी आपला सहभाग नोंदवला. या गृहोपयोगी वस्तूंच्या प्रदर्शन व विक्री सोहळ्यात प्रसिद्ध अभिनेत्री सविता मालपेकर, अभिनेते प्रमोद पवार यांनी भेट दिली. या कार्यक्रमाचे संपुर्ण नियोजन सौ. ज्योती जोशी, श्रीमती आश्विनी नारविलकर, सौ. माधवी सरदेशमुख, सौ. रोहिणी तडवळकर यांनी केले होते. लक्ष्मीनारायण या वास्तूमध्ये प्रथमच अशा प्रकारची गृहोपयोगी वस्तूंचे प्रदर्शन लावण्यात आले होते. सदर उपक्रमामुळे संस्थेला सुपारे रु. ७५०००/- नफा नोंदविण्यात आला आहे. याबद्दल श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी आयोजकांचे आभार व्यक्त करून अशा प्रकारचे उपक्रम वारंवार राबविण्याची सूचना केली. या चौघींच्या अथक प्रयत्नानेच सदर शिबीर यशस्वी झाले.




Protect Capital & Create Wealth.....

JAYANT DESHMUKH

B.COM. CAIIB DBM

Insurance & Investment Consultant

LIC (MDRT 2020) Mediclaim, Health Insurance & Mutual Fund

M. : 9930445721 / 9702837022

Email : deshijayant5@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

- Joint Treasurer - Deshastha Rugvedi Brahman Sangha, Kalyan
- Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
- Member - Brahman Business Network Group, Kalyan
- Past Manager, State Bank of India
- Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
- Trustee, Balaji Mandir Trust, Kalyan
- General Secretary, Karnataka Sangha, Kalyan
- Past Vice President, Andhra Association, Kalyan
- Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance

Get Insured... & Be Secured....

* श्री क्षेत्र अयोध्या येथील श्रीराम मूर्तीची प्राणप्रतिष्ठा आणि भव्य मंदीराचे उद्घाटन सोहळ्याचे औचित्य साधून अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळातर्फे श्रीराम रक्षा स्तोत्र पठण सप्ताह आयोजित करण्यात आले होते. संस्थेच्या लक्ष्मीनारायण या वास्तूस आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. हा कार्यक्रम दि. १५ जानेवारी २०२४ पासून २१ जानेवारी २०२४ पर्यंत दररोज संध्याकाळी ६.०० ते ७.३० पर्यंत सलग अकरा वेळा रामरक्षा स्तोत्राचे सामूदायिक पठण करण्यात आले. गीता संस्थेचे गुरुवर्य श्री. श्रीकृष्ण जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत रामरक्षा स्तोत्राचे सामूदायिक पठण करण्यात आले. दि. २४.०१.२०२४ रोजी श्री मोहनबुवा रामदासी यांचे अयोध्येतील रामजन्मोत्सव आणि मूर्तीच्या प्रतिष्ठापनेविषयी 'प्रभु आले मंदिरी' या विषयावर सुश्राव्य प्रवचनाने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. याप्रसंगी भाविकांनी समर्थांच्या पादुका दर्शनाचे तसेच प्रसादाचा लाभ घेतला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. विलास जोशी, कार्याध्यक्ष प्रभाकर कुलकर्णी, श्री. शरदचंद्र झरेगावकर, श्री. विनोद मांडके, श्री. मिलिंद सरदेशमुख, श्री. विवेक देशपांडे तसेच मुंबई के.ई.एम. माजी अधिष्ठाता श्री. येवलेकर आणि व्यवस्थापक श्री. विकास माने आणि दादर मुंबई स्थित भाविकांची उपस्थिती लक्षणीय होती.

* प्रजासत्ताक दिन : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या लक्ष्मीनारायण वास्तूत प्रतिवर्षी प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो. दि. २६ जानेवारी २०२४ रोजी संस्थेच्या प्रांगणात झेंडावंदन करून प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. संस्थेचे व्यवस्थापक श्री. विकास माने, चारुहास हंबीरे, देवेंद्र दळवी तसेच दादर स्थित अनेक बंधु-भगिनी या समारंभास उपस्थित होते.

**मुलुंड :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था मुलुंड तर्फे महिला शाखा स्नेहसंमेलन व तिळगुळ समारंभ दिनांक बुधवार २४-१-२०२४ रोजी संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात महिला शाखा अध्यक्षा डॉ.सौ. प्रेरणा क्षीरसागर, उपाध्यक्षा सौ. उज्वला जोशी व एकपात्री प्रयोग सादरकर्त्या सौ. चैताली खटी यांनी दिप प्रज्वलन करून केली. त्यानंतर सौ. चैताली खटी यांचे औक्षण करण्यात आले. सौ. आरती कुलकर्णी यांनी राजमाता जिजाबाई यांच्या वर चारोळी सादर करत अतिशय सुंदर सूत्रसंचालन केले. महिला शाखा अध्यक्षा डॉ. सौ. प्रेरणा क्षीरसागर यांनी आपल्या प्रास्ताविकात माजी विश्र्वस्त श्री विभाकर देवरे यांनी आपल्या पत्नीच्या स्मरणार्थ दिलेल्या देणगीतून दरवर्षी महिला शाखा असेच वेगवेगळे आशयघन कार्यक्रम आयोजित करून स्नेहसंमेलन उत्साहात साजरे करते असे सांगितले. सौ. मेघना कुलकर्णी यांनी सौ.चैताली खटी यांचा परिचय करून दिला. महिला शाखा अध्यक्षा डॉ सौ. प्रेरणा क्षीरसागर यांनी तुळशीचे रोप व श्रीफळ देऊन स्वागत केले. संवादिनी साथीदार श्रीमती अनिता श्रौती व तबला साथीदार सौ. जान्हवी मराठे यांचाही सत्कार महिला शाखा उपाध्यक्षा व विश्र्वस्त सौ. उज्वला जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष श्री. अशोक जहागिरदार, विश्र्वस्त प्रमुख श्री. विजय वडगबाळकर आर्वजून उपस्थित होते. सौ. चैताली खटी यांनी 'राजमाता जिजाबाई' हा एकपात्री प्रयोग सुरू केला. छत्रपति शिवाजी महाराजांचा जन्म, जडणघडण, केलेले संस्कार प्रेक्षकांसमोर उलगडून दाखवले. त्याकाळी स्रियांवर होणारे अत्याचार ऐकून सगळ्यांचे डोळे आपोआप पाणावले. राजमाता जिजाबाई आदर्श माता होत्या. सौ. चैताली खटी यांनी सकारात्मक विचार नवीन रंगात व ढंगात सादर केले. उपस्थितांना कार्यक्रम खूपच आवडला. असे कार्यक्रम समाजाला मार्गदर्शक ठरतील व स्वागतार्ह बदल घडतील अशी अपेक्षा. कार्यक्रमानंतर सर्वांनी अल्पोपहाराचा आस्वाद घेतला.

**कल्याण :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण आयोजित एक दिवसीय वधुवर पालक परिचय मेळावा रविवार दि.२८ जानेवारी २४ रोजी सेरेमनी बँक्वेट हॉल, कोन गांव, कल्याण (प) येथे मोठ्या उत्साहात संपन्न

झाला.कार्यवाह रमेश पालकर यांनी सर्व प्रमुख पाहुणे, वक्ते, मान्यवर, वधुवर व पालक तसेच या प्रसंगी उपस्थितांचे स्वागत केले. यानंतर स्थानापन्नीत मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन, गणेश पुजन करण्यात आले. संस्था महिला सभासद कडून श्री गणेश, सरस्वती, लक्ष्मी नारायण यांचे सुश्राव्य गणेश वंदन व शांती पठन झाले. संस्था अध्यक्षांच्या हस्ते प्रमुख पाहुणे श्रीमान जगन्नाथराव जोशी (अध्यक्ष दे. ऋ. ब्रा. संघ डोंबिवली) तसेच श्रीमान दिपक देशपांडे (विश्वस्त दे. ऋ. ब्रा. संघ डोंबिवली) यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

अध्यक्षांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांपैकी श्री यशवंत पांगारकर, श्री मंगेश पाटील (क.ज.सह.बँकेचे संचालक) डोंबिवली संस्थेचे कार्यवाह श्री जोशी, तसेच प्राचार्य श्री घनश्याम आमटे, माजी अध्यक्षा माधवी देशपांडे, यांचे पुष्प गुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

वैद्य सौ. आदिती कुलकर्णी यांनी केले, यात विवाहापूर्वी च्या अपूर्ण माहीती तून होणारी वैद्यकीय/ शारीरिक अडचणी यावर उदाहरण देऊन मार्गदर्शन केले. त्यावेळी त्यांचा सन्मान शाल व पुष्प गुच्छ देऊन महिला प्रमुख सौ शुभांगी कुलकर्णी यांच्या हस्ते केला.कार्यक्रमाच्या निवेदनाची सर्व सुत्रे सौ वृषाली वरुडकर व अधिवक्ता श्री मंदार कुलकर्णी यांनी खुमासदार पणे सांभाळली होती,यावेळी संस्थेच्या अनेक सभासदांनी संपूर्ण कार्यक्रमात मोलाची जवाबदारी पार पाडली,त्यानंतर श्री मंदार संत यांनी उपस्थित मान्यवर, प्रायोजक, कार्यकारणी सदस्य, वधुवर पालक यांचे संस्थेतर्फे आभार मानले. पाच वाजता मेळाव्याचा समारोप झाला.

✻ दिनांक २० जानेवारी २०२४ रोजी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ कल्याण शाखा वार्षिक संक्रांत हळदी कुंकू तिळगुळ समारंभ कार्यक्रम अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणामध्ये आणि आनंदात आपल्या देशस्थ ऋग्वेदी मंडळाच्या ऑफिसमध्येच संपन्न झाला..अंदाजे ५० च्या आसपास मैत्रिणी हजर होत्या या कार्यक्रमांमध्ये काही स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. एक वेगळीच स्पर्धा आयोजित केली गेली होती... ती म्हणजे आधी प्रत्येक मैत्रिणीने आपलाच व्हिडिओ बोधकथा सांगून पाठवायचा होता. त्याच्यामध्ये १२ /१३ जणींनी प्रयत्न छानच केला आणि आपल्या नावावरती बक्षीसावर शिक्का मोर्तब केले. हा कार्यक्रम असा कार्यक्रम पहिला घेण्यात आला त्यामुळे जितक्या मैत्रिणींनी भाग घेतला होता तितक्या सर्वच जणींना उत्स्फूर्तपणे फुल ना फुलाची पाकळी समजून एक छोटसं बक्षीस देण्यात आले. या स्पर्धेचे व्हिडिओ आपण बाहेर एका मैत्रिणीकडे पाठवण्यात आले होते. त्याच्यामध्ये प्रथम क्रमांक सौ प्रतीक्षा भोपर्डीकर, द्वितीय क्रमांक सौ अश्विनी क्षिरसागर, तृतीय क्रमांक सौ रेखा कुलकर्णी यांच्या नावावर ती शिक्कामोर्तब झाले आहेत. सौ. शुभांगी कुलकर्णी देशस्थ ऋग्वेदी मंडळ कल्याण शाखा महिला प्रमुख आणि त्यांच्या टीम मध्ये गीताई काळकर, श्रुतीका




कुलकर्णी, अश्विनी क्षीरसागर, अंजली पुरोहित, माया देवभानकर मेघा पुणतांबेकर, आणि सुजाता जोशी या संपूर्ण टीमचे मोलाचे सहकार्य लाभले त्याचबरोबर देशस्थ ऋग्वेदी मंडळ उपाध्यक्ष सौ वैजयंती पत्की यांनी सुद्धा सहकार्य केले. सर्वात महत्त्वाचं म्हणजे कुठल्याही कामाला नाही म्हणणार नाही असे असे श्री. विजय चावरे काका यांनी तिळगुळ समारंभासाठी खूप मदत केली.

**अकोला** : दि. १८ जाने.२०२४ रोजी दे.ऋ.ब्रा. जठारपेठ स्थित कार्यालयातील प्रांगणात मंडळातर्फे घेण्यात येणारा संक्रांती निमित्त हळदीकुंकाचा कार्यक्रम संपन्न झाला. हळदीकुंकू सोबतच आनंद मेळावा व महिला उद्योजकांनी वस्तु विक्री असे मिळुन ४० स्टॉल लावले होते. काही महिलांनी स्वतः हातांनी बनवलेल्या विविध प्रकारच्या वस्तु तसेच गृह ऊपयोगी वस्तु तसेच आनंदमेलात चवदार खाद्य पदार्थाची रेलचेल असे विविध स्टॉल लावले होते. आपल्या महिला ऊद्योजकांना प्रोत्साहन मिळावे हा त्या मागचा उद्देश.

श्रीराम प्रश्नमंजुषा या कार्यक्रमाचे संचालन सौ. मृणाल कुलकर्णी ह्यांनी केले व त्यावेळी बक्षिसांची लूट झाली. ह्या वेळेस ४०० महिलांनी स्टॉलला भेटी देऊन खरेदी सोबत खाण्याचा अस्वाद घेतला. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष श्री. ह.श.महाशब्दे, उपाध्यक्ष श्रीमती ज्योतिताई देशमुख ह्यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सर्व महिला सदस्यांचेसहकार्य लाभले.

संयोजिका सौ मेधा देशमुख, सह संयोजिका सौ. सुवर्णा देशपांडे, सौ. संजीवनी कुळकर्णी, सौ. मंजुषा घोटिकर, दे.रु.ब्रा.महिला मंडळ शाखा अकोला सदस्य यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

**सोलापूर** : सोलापूर येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेतर्फे आयोजित तीन दिवसीय दासबोध मार्गदर्शन वर्गाची महाआरतीने उत्साहात सांगता झाली. सेवासदन प्रशालेतील सभागृहात झालेल्या या वर्गात सुमारे शंभर साधकांनी सहभाग घेतला. मुंबईचे कार्पोरेट किर्तनकार व निरुपणकार समीर लिमये यांनी तीन दिवस साधकांना मनाचे श्लोक व दासबोध वाचनाची पध्दत, त्यातील समर्थांना अपेक्षित अर्थ व त्यातून साधकाला होणारे समाधान याबाबत विस्तृत मार्गदर्शन केले. दरम्यान या वर्गाची सुरुवात सेवासदन संस्थेच्या सोलापूर शाखाध्यक्षा प्रा. शिला मिस्त्री यांच्या हस्ते दीपप्रज्वलनासह श्रीराम जय राम जय जय राम च्या नामघोषातील ग्रंथदिडीने झाली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, प्रमुख कार्यवाह श्याम जोशी, उपाध्यक्ष दत्तात्रय आराध्ये, खजिनदार सतीश पाटील, सदस्य शंकर कुलकर्णी, योजनगंधा जोशी,संपदा पानसे, वेदमूर्ती योगेश जोशी उपस्थित होते. वर्गाच्या दुसऱ्या दिवशी निरुपणकार समीर लिमये यांनी संपादित केलेल्या मनाचे श्लोक पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, प्रा. प्रसाद कुंटे व प्रा. प्राची कुंटे यांच्या हस्ते झाले. समारोपावेळी दासबोध ग्रंथाची महाआरती करण्यात आली. यावेळी वर्गासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. दासनवमीला दासबोधाचे सामुदायिक पारायण सोहळा करण्याचा निर्धार यावेळी सहभागी साधकांनी व्यक्त केला. ह.भ.प.अपर्णा सहस्त्रबुध्दे यांनी सूत्रसंचालन केले. ह.भ.प.श्याम जोशी यांनी आभार मानले.

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था आयोजित दासबोध मार्गदर्शन वर्गाच्या समारोपावेळी निरुपणकार समीर लिमये यांचा सन्मान करताना प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, श्याम जोशी, सतीश पाटील, योगेश जोशी, शंकर कुलकर्णी, योजनगंधा जोशी, अपर्णा सहस्त्रबुध्दे व प्रा.शीला मिस्त्री.

**नाशिक** : ऋग्वेदी संस्था नाशिकच्या वतीने दरवर्षीप्रमाणे संस्थेचे वार्षिक स्नेहसंमेलन तिळगुळ समारंभ विद्यार्थी पारितोषिक वितरण शिष्यवृत्ती व गुणगौरव संस्थेस देणगी देणाऱ्यां देणगीदारांचा सन्मान महिला शाखा पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन देशस्थ ऋग्वेदी संस्थेच्या तिडके कॉलनी येथील ऋग्वेद सभागृहात करण्यात आले यावेळी कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून झाली यावेळी

अध्यक्षस्थानावरून बोलताना मुंबई स्थित अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष विलास जोशी यांनी ब्राह्मण समाजाला देवाने एक असे आरक्षण दिले आहे की जे कोणीही आपल्याकडे असलेले आरक्षण हिरावून घेऊ शकत नाही ते म्हणजे आपल्या ब्राह्मण समाजाला दिलेले बुद्धीचे आरक्षण त्यामुळे आपल्या बुद्धीचा योग्य वापर करून आपला व आपल्या समाजाचा विकास करावा त्यासाठी लागणारी मदत मार्गदर्शन दोन्ही ऋग्वेदी संस्था करीत असतात तरी जास्तीत जास्त ऋग्वेदी ब्राह्मण सभासदांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन केले तसेच प्रमुख पाहुणे कर्नल आनंद देशपांडे यांनी आपल्या मनोगतात संस्था करीत असलेल्या कार्याचा गौरव केला तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या यावेळी व्यासपीठावर देशस्थ ऋग्वेदी संस्थां नाशिकचे अध्यक्ष मुकुंद कुलकर्णी उपाध्यक्ष विजयकुमार शिरसागर कार्याध्यक्ष सुहास पाटील कार्यवाह मकरंद सुखात्मे सहकार्याध्यक्ष मंदार तगारे सहकार्यवाह राजेंद्र खेडलेकर खजिनदार विनायक ऐडगावकर विश्वस्त मोहिनीराज कुलकर्णी. व य कुलकर्णी युवक शाखा अध्यक्ष अनंत दशपुत्रे महिला शाखा अध्यक्ष सविता कुलकर्णी हे उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक निशाद दसपुत्रे तर देणगीदार सन्मान सन्मान व विद्यार्थी पारितोषिकाच्या यादीचे वाचन विशाल शिंगवे कर व संदीप गोसावी यांनी केले कार्यक्रमासाठी संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी. कार्यकारिणी संचालक दिगंबर कुलकर्णी, राजेंद्र हातवळणे, किशोर हिंगणे, अजय चौधरी, पंकज उंदीरवाडकर, गुरुजी वसंत दंडवते पत्रकार प्रशांत निरंतर, महिला शाखा सदस्यां सुचिता देवरे, माधवी तगारे, मनीषा पाटील, रश्मी हातवळणे, श्रीमती कुलकर्णी, सौ. कुलकर्णी, सौ. क्षीरसागर, सौ. खेडलेकर, कार्यालयीन कर्मचारी दीप्ती हिंगणे व दत्ता देवळालकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# वसंत पंचमी

**संगीता कुलकर्णी** (मो. : ९८७०४५१०२०)

आपल्याकडील प्रत्येक सण उत्सवाला एक विशेष अर्थ आहे. तसंच वसंत पंचमीचे महत्त्वही वेगळे आहे. वसंत पंचमी साजरी करण्याला हिंदू धर्मात अनेक मान्यता आहेत..

सृष्टीतील नवचैतन्य नवनिर्मितीमुळे मिळणारा आनंद साजरा करण्यासाठी हा उत्सव साजरा केला जातो..

वसंत पंचमी ही शिशिर ऋतूमध्ये येणारी माघ शुद्ध पंचमी होय. वसंत पंचमीलाच श्री.पंचमी किंवा ज्ञानपंचमी असे म्हणतात. वसंत ऋतूला ऋतूंचा राजा असे मानले जाते. त्याचे स्वागत करण्याचा हा विशेष दिवस..

माघ शुक्ल पंचमीला वसंतोत्सवाची सुरूवात होते... नवसृजन, चैतन्य, आनंद, उत्साह यांचे लेणे घेऊन वसंत येतो. रंगांची, गंधाची, प्रेमाची, चैतन्याची मुक्तहस्ते उधळण करीत येणाऱ्या वसंताच्या आगमनाची तयारी म्हणून वसंत पंचमी' साजरी करतात.

वसंत पंचमीला मोहरीच्या फुलांना येणाऱ्या बहराचा शुभारंभ मानला जातो. वसंत पंचमी पासून फाल्गुन पौर्णिमेपर्यंत वसंतोत्सव साजरा करतात.. वसंत ऋतूत पळसाला बहर येतो.. भारतात साधारणतः मकर संक्रांतीनंतर सूर्याचे उत्तरायण सुरू होतानाच्या या काळात येणारा हा सण आहे. भारतात वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या पद्धतीने हा सण साजरा होत असला तरी खास करून या दिवशी नृत्य आदि कला शिकविणाऱ्या संस्थांत विद्येची देवता – सरस्वतीची पूजा करण्याची प्रथा आहे.. माघ महिन्यातील पंचमीला देवी सरस्वती

पृथ्वीतलावर अवतरली.. यामुळे माघ महिन्यातील पंचमी सरस्वतीच्या नावाने साजरी केली जाते. वसंत ऋतूही याच दरम्यान बहरत असल्यामुळे या पंचमीला वसंत पंचमी म्हटले जाते.. विद्येची देवता सरस्वतीची पूजा या दिवशी केली जाते.. सरस्वती देवी ही विद्येची आणि ज्ञानाची देवता असून तिच्या हातात पुस्तक, वीणा असते. तर एका हाताची मुद्रा केलेली असते. याचाच अर्थ चांगली बुद्धीमत्ता, उत्तम शिक्षण तसंच शिक्षणेतर कलेत प्रावीण्य मिळवण्यासाठी सरस्वती देवीची प्रार्थना केली जाते. देवीच्या हाताची मुद्रा एकाग्रता दर्शवते.

वसंत पंचमीपासून वसंत ऋतू सुरू झाला असे समजले जाते. हा दिवस देवी सरस्वतीचा जन्मदिवस आहे. वसंत पंचमी ही कामदेवाच्या पूजेसाठीही ओळखली जाते..

सुफी परंपरेतील चिश्ती संप्रदायात हजरत निजामुद्दीन अवलियाचे शागीर्द मोहरीच्या पिवळ्या फुलांच्या रंगात बुडविलेली वस्त्रे नेसून हा सण साजरा करतात. मध्ययुगात या दिवशी 'सुवसंतक' नावाचा उत्सव होत असे.

वसंत पंचमीचा कृषी संस्कृतीशीही संबंध दिसून येतो. या दिवशी नवान्न इष्टी असा एक छोटा यज्ञ करतात. शेतात तयार झालेल्या नवीन पिकाच्या लोंब्या घरात आणून त्या देवाला अर्पण करतात. हा दिवस देवी सरस्वतीचा जन्मदिवस म्हणूनही साजरा केला जातो. मथुरा, वृंदावन, राजस्थान या भागात या दिवशी विशेष उत्सव साजरा केला जातो. या दिवशी गणपती, इंद्र, शिव आणि सूर्य यांची प्रार्थनाही होते. बंगाल प्रांतात तर या दिवशी भक्तिगीते म्हणत प्रभातफेरी काढतात... पश्चिम बंगालमध्ये या दिवशी सर्वजण पिवळी वस्त्रे परिधान करून सरस्वतीची पूजा करतात. देवीच्या पायाशी पुस्तके व लेखण्या ठेवून देवीचा आशीर्वाद घेतात. काही लोक उपासही करतात. सरस्वतीला फुले वाहतात. याला 'पुष्पांजली' असे म्हणतात. या दिवशी लहान मुलांच्या पाटीवर पहिली मुळाक्षरे काढून देऊन त्यांच्या शिक्षणाची सुरुवात करतात.

राजस्थान - पिवळा पोशाख घालून, गोड जेवण करून, पिवळ्या रंगांच्या फुलांनी घराची सजावट करून हा उत्सव साजरा करतात. राजस्थानात मोगऱ्याच्या फुलांच्या माळा गळ्यात घालणे आवश्यक मानले जाते. तर

सुफी संप्रदायात.. लोचन सिंग बक्षी यांच्या मतानुसार बाराव्या शतकात भारतीय सुफी मुस्लीम व्यक्तींनी ह्या हिंदू उत्सवाचा स्वीकार केल्याचे दिसते चिश्ती संप्रदायानुसार आमीर खुस्रो यांनी एका हिंदू महिलेला या दिवशी पिवळी साडी नेसून मंदिरात गेल्याचे पाहून या संप्रदायाने ही पद्धत स्वीकारली असे मानले जाते.. ( माहितीप्रमाणे)

शीख संप्रदायात-- वसंत ऋतूचा प्रारंभ म्हणून शीख संप्रदाय हा दिवस उत्सव म्हणून साजरा करतो. गुरुद्वारामध्ये सामाजिक उत्सव म्हणून या दिवसाचे आयोजन करण्याची पद्धत महाराजा रणजीतसिंग यांनी सुरू केली. या उत्सवाचा भाग म्हणून पतंग उत्सव करणे हा होय. या उत्सवाची सुरुवात अमृतसरमधील हरमंदिर साहिब गुरुद्वारा येथून झाली. महाराजांच्या दरबारातील विशेष कार्यक्रम या दिवशी होत असे आणि त्या दिवशी त्यांचे मंत्री आणि सैनिक पिवळ्या रंगाचा पोशाख परिधान करीत असत.. भारतातीलच नव्हे तर फाळणीनंतर पाकिस्तानात गेलेल्या पश्चिम पंजाबातसुद्धा वसंतपंचमी ही पतंगोत्सवाच्या स्वरूपात साजरी केली जाते... शेतातील सरसों (मोहरी) ची फुले पिवळी जर्द झाल्यावर नदीकाठी पंजाबात हा दिवस साजरा केला जातो..

वसंतपंचमी हा सर्व प्रकारच्या शुभकार्यांसाठी अत्यंत शुभमुहूर्त मानला गेला आहे. यांत प्रामुख्याने विद्याप्राप्ती आणि गृहप्रवेश यांसाठी वसंतपंचमीला पुराणांतही अतिशय श्रेयस्कर मानले गेले आहे. वसंतपंचमीला शुभमुहूर्त मानण्यामागे अनेक कारणे आहेत. हे पर्व बहुतेक वेळा माघ महिन्यातच येते. माघ महिन्याचे धार्मिक आणि आध्यात्मिक दृष्टीनेही विशेष महत्त्व आहे. या महिन्यात पवित्र तीर्थक्षेत्री स्नान करणे हे विशेष महत्त्वाचे मानले गेले आहे. वसंत पंचमीला बाहेर फुलांना बहर येतो तर लोकांमध्ये उत्साह व आनंद यांना बहर येतो. सृष्टी प्रमाणेच मानवी जीवनातही आनंद व उत्साह वृद्धिंगत यावा यासाठी हा उत्सव साजरा करतात.

# हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवराय



**दत्ता आराध्ये (मो. ९७६५५६६८८५)**

शिवाजी शहाजीराजे भोसले अर्थात छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी पुणे जिल्ह्यातील जुन्नर जवळील शिवनेरी या डोंगरी किल्ल्यावर झाला. छत्रपती शिवरायांनी स्वतःचे स्वतंत्र राज्य निर्माण करून मराठा साम्राज्याची स्थापना केली. १६७४ मध्ये रायगड किल्ल्यावर छत्रपती म्हणून राज्याभिषेक करण्यात आला.

आपल्या कारकिर्दीत छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघल साम्राज्य, गोवळकोंड्याची कुतूबशाही, विजापूरची आदिलशाही आणि युरोपियन वसाहतवादी विरोधात लढून स्वतःचे साम्राज्य निर्माण केले. शिस्तबध्द लष्कर आणि सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. किनारी आणि अंतर्गत प्रदेशातील किल्ल्यांची डागडुजी करण्याबरोबरच नवीन किल्ले ही उभारले. त्यांनी प्राचीन हिंदू परंपरा पुनरुज्जीवित केली.

प्रदेशातील भूभागांची इत्यंभूत माहिती, आश्चर्यजनक वेगवान हालचाली आणि गनिमी काव्याचे तंत्र याच्या जोरावर थोडक्या फौजेच्या साह्याने बलाढ्य अशा मुघल आणि आदिलशाही फौजांचा यशस्वी सामना केला. राज्यकारभारात तत्कालीन रूढ असलेल्या पारशी भाषे ऐवजी मराठी आणि संस्कृत भाषेचा वापर करण्यास प्रोत्साहन दिले. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात राष्ट्रवादी नेत्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची महती सांगत लोकांना एकत्र आणून त्यांचे मनोबल वाढविण्याचा प्रयत्न केला.

महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक इतिहासामध्ये शिवाजी महाराजांचा मोठा प्रभाव आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे मराठी लोकांच्या अस्मितेचा भाग आहेत. शिवाजी महाराजांचा जन्मदिवस हा शिवजयंती म्हणून सर्व दूर साजरा केला जातो.

छत्रपती शिवराय जेव्हा पुण्याचा कारभार पहात होते तेव्हा त्यांनी स्वतंत्र राजमुद्रा करून घेतली. शिवाजी महाराजांनी राजमुद्रेसाठी संस्कृत भाषेचा वापर केला. शिवाजी महाराजांकडे स्वतःची अशी सुसज्ज फौज होती. शिवाजी महाराज जाणून होते की मुघलांच्या प्रचंड तसेच दारूगोळा व तोफखान्यांनी सज्ज असलेल्या फौजेला पारंपारिक युद्ध पद्धतीने हरविणे कठीण होते. त्यामुळे महाराजांनी स्वतःची अशी युद्धनीती विकसित केली. जिला गनिमी कावा म्हणून ओळखले जाते. ही युद्धनीती अतिशय यशस्वी ठरली. मुघलांच्या मोठमोठ्या फौजा शिवरायांच्या छोटेखानी फौजेसमोर निष्प्रभ ठरल्या. केवळ महाराष्ट्र, भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात छत्रपती शिवरायांचे नाव अतिशय आदराने घेतले जाते. शिवरायांच्या साहस कथा, विचार, तत्त्वज्ञान आजही सर्वांना प्रेरणा देतात. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनच एवढे भव्य आहे की, ज्याचे अवलोकन करावे तेवढे थोडेच. ते एकाच वेळी द्रष्टे, स्वातंत्र्य योध्दे, सेनापती, संघटक, स्फूर्तीदाते, युगपुरुषोत्तम होते. महाराजांच्या कुठल्याही गुणाला, त्यांच्या काळातच नव्हे तर आताच्याही कित्येक शतकात तोड नाही. असा हा राजा केवळ पुण्यवंत राजाच नव्हता तर तो आदर्श नीतिवंत राजा होता.

अशा छत्रपती शिवाजी महाराजांची १९ फेब्रुवारीला जयंती साजरी होत आहे. अशा या राजाला मानाचा मुजरा. समर्थ रामदास स्वामी यांनी छत्रपती शिवरायांचा निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसी आधारू। अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी।। असा शब्दात गौरव केला आहे.

# मराठी सण आणि भरड धान्याचा वापर

**डॉ. साधना उमरीकर** (मो. : ९४२०५३००६७), **डॉ. अश्विनी बोडखे**

प्राचीन काळापासून मानवाच्या गरजा पूर्ण करणाऱ्या निसर्गाला, अद्भुत शक्तीला मानवाने देव मानले. डोंगर, सूर्य, चंद्र, तारे या शिवाय निसर्ग चक्राचा देखील त्याने अभ्यास केला. ऋतूचक्राच्या आणि बदलांच्या आधारे त्याने कालगणना सुरु केली. निसर्गातील बदल अभ्यासले आणि या ऋतूमधील बदलांचे सोहळे किंवा सण साजरे करणे सुरु केले. मातीत रुजणाऱ्या, फुलणाऱ्या लोकजीवनाला घडवण्यात संस्कृतीचं रंगरूप प्राप्त करून देण्यात सण, उत्सवांचं अस्तित्व महत्त्वाचं ठरतं. माणसांना जवळ आणण्याचं, एकत्र बांधून ठेवण्याचं, भावनिक एकोप्याबरोबर एकात्मता साधण्याचं मौलिक सांस्कृतिक कार्य सण, उत्सव करत असतात. म्हणूनच आपल्या देशातल्या सांस्कृतिक जीवनात सण, उत्सवांना महत्त्व आहे. आजच्या पिढीला सणाची पार्श्वभूमी, परंपरा, सण साजरा करण्याची पद्धती, खाद्यपदार्थ इत्यादींविषयी माहिती असणे आवश्यक आहे. आपली प्राचीन भारतीय संस्कृती अध्यात्म आधारित आहे.

मानवी जीवनाला अध्यात्म, भक्तिभावाचा स्पर्श देण्यासाठी सर्वच सण-उत्सवांना ईश्वरी अधिष्ठान आहे. त्यामुळे सर्वच सण धार्मिक भावनेनं, श्रद्धेनं साजरे केले जातात. प्रत्येक सणाच्या दिवशी होणारे खास खाद्यपदार्थ तर आपल्या सणांचं खास वैशिष्ट्य. पुरणपोळीशिवाय होळीची, तीळगुळाशिवाय संक्रांतीची आणि चकलीशिवाय दिवाळीची कल्पनाच करता येत नाही. खगोलतज्ञ दा. कृ. सोमण म्हणतात आपले सारे सण हे निसर्गाचे रक्षण करणारे, कृषी संस्कृतीशी नाते सांगणारे आहेत. ईश्वराची पूजा भीतीपोटी करण्यापेक्षा श्रद्धेने करावी आणि निसर्गरक्षणाच्या मूळ उद्देशाचे जतनदेखील करावे, हेच आधुनिक व्रत ठरेल.

आपल्या संस्कृतीप्रमाणे पारंपारिक खाद्यसंस्कृतीनुसार भरडधान्ये पिकविली जात आणि त्यांनाच आहारात देखील अग्रस्थान होते. भरडधान्यामध्ये महाराष्ट्रात ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, राजगिरा या पिकांची लागवड मोठ्या प्रमाणात होते. कदाचित म्हणूनच या धान्याला पारंपारिक, पौष्टिक आणि अध्यात्मिक महत्व प्राप्त झालेले आहे. काही दशकांपूर्वी झालेल्या हरित क्रांतीमुळे गहू आणि तांदूळ या दोन पिकांची लागवड वाढल्यामुळे काही प्रमाणात आपले पारंपारिक धान्ये मागे जरी पडली असली तरी आंतर राष्ट्रीय भरडधान्य वर्ष २०२४ च्या निमित्ताने या धान्याचे महत्व वाढले असून पूर्वी अशा धान्यापासून केलेल्या विविध पदार्थांना सण समारंभांमध्ये देखील स्थान होते. थोडक्यात आपल्या कडे जे पिकते त्यालाच महत्व असून त्याचा वापर करण्यापूर्वी देवदेवतेला अर्पण करण्याची प्रथा होती. या धान्याचे महत्व अधोरेखित करणारे काही सण पुढे देण्यात आले आहेत. १. **मकर संक्रांत** : मकर संक्रांती या सणाला देशाच्या इतर भागांमध्ये उत्तरायण किंवा पोंगल म्हणूनही ओळखले जाते. या दिवशी तीळ लावलेली पोळी किंवा तीळ लावलेली बाजरीची भाकरी करतात. काही ठिकाणी बाजरीची गुळ घालून गोड भाकरी देखील बनवितात. या सोबतच विविध भाज्या एकत्र करून भाजी बनविली जाते. २. **शाकंबरी नवरात्र उत्सव** : हा उत्सव जानेवारी महिन्यात नऊ दिवस असून पौर्णिमेला कुलाचार करतात. काही ठिकाणी पुरण पोळी तर अनेक घरात विशेषतः गरीब कुटुंबात देवीला अंबाडीची भाजी आणि ज्वारीची भाकरी याचा नैवेद्य दाखवतात. ३. **आषाढी एकादशी** : महाराष्ट्रातील महान हिंदू देवता श्री विठ्ठलाच्या सन्मानार्थ साजरी केली जाणारी आषाढी एकादशी, महाराष्ट्रातील पंढरपूर शहरातील प्रमुख सण आहे. या निमित्त राज्यभरात लोक उपवास करतात. उपवासाला भगर, राजगिरा, राळा यापासून केलेले पदार्थ सेवन केले जातात. ४. **नागपंचमी** : महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा सण. नागपंचमी हा नागदेव

शेषनाग यांच्या सन्मानार्थ पवित्र श्रावण महिन्याच्या पाचव्या दिवशी साजरा केला जातो. नागाची पूजा हा भारतातील एक महत्त्वाचा विधी आहे आणि या सणाला घरोघरी मातीपासून बनवलेल्या नागाची पूजा केली जाते. नाग (साप) उंदीर आणि उंदीरांपासून पिकांचे संरक्षण करतात. म्हणून शेतकरी नागदेवतेची प्रार्थना करतात आणि त्यांचे आभार मानतात. या दिवशी ज्वारीच्या लाह्या आणि दुध नैवेद्य म्हणून नागाला अर्पण करतात. काही ठिकाणी नाग पंचमीला ज्वारीचे दिंड करण्याची प्रथा आहे तर काही ठिकाणी वरईची कोंडी (एक पारंपारिक पदार्थ) हा मुख्य नैवेद्य म्हणून बनविला जातो. ५. **कृष्ण जन्माष्टमी/दही हंडी** : श्रावण महिन्यात गोकुळ अष्टमी किंवा जन्माष्टमी म्हणून भगवान श्रीकृष्णाचा जन्म साजरा केला जातो. भगवान श्रीकृष्णाच्या जन्माच्या पूर्वसंध्येला भाविक मध्यरात्रीपर्यंत उपवास करतात. भगवान कृष्णाच्या जन्माचे प्रतीक म्हणून कृष्णजन्म मध्यरात्री मंदिरांमध्ये आणि घरांमध्ये साजरा केला जातो. या दिवशी ज्वारीच्या लाह्या, दही आणि इतर पदार्थ जसे की काकडीचे तुकडे, साखर किंवा गुळ, तिखट मीठ मिसळून काला केल्या जातो. हाच नैवेद्य म्हणून भगवान कृष्णाला दाखवल्या जातो. हा गोपालकाला बाळ गोपालांना वाटल्या जातो. हा अतिशय रुचकर आणि पौष्टिक पदार्थ आहे. ६. **गणपती आणि गौरी पूजन** : भाद्रपद महिन्यात एकानंतर एक असे हे दोन उत्सव साजरे केले जातात. या काळात गव्हाच्या पिठापासून मोदकांचा, वळीव लाडवांचा किंवा कोकण प्रांतात तांदळाच्या पिठापासून तयार केलेले उकडीचे मोदक करून गणपतीला त्याच्या आवडीचा नैवेद्य दाखवतात. गौरीच्या आगमनानंतर तीन दिवस विविध प्रकारचे पदार्थ जसे की लाडू, अनारसे, करंज्या, पुरण पोळी आणि विविध भाज्यांचा नैवेद्य अर्पण केल्या जातो. काही ठिकाणी ज्वारीचे दिवे किंवा सोळवे तसेच ज्वारीच्या पीठाचे आंबील करण्याची प्रथा आहे. या बरोबरच अंबाडीची भाजी आणि भाकरी हे देखील गौरीचे आवडीचे पदार्थ असल्यामुळे नैवेद्यासाठी बनवले जातात. ७. **नवरात्रोत्सव** : अश्विन प्रतिपदेपासून देवीचे नवरात्र बसते. नऊ दिवस देवी घटात बसते. दहावे दिवशी विजया दशमीच्या दिवशी मुख्य कुलाचार केल्या जातो. नवरात्रीतील नऊ दिवस अनेक जण उपवास करतात. या काळात भगर, राजगिरा वरई पासून विविध पदार्थ केले जातात. भगर आणि राजगिरा या पासून उपमा, शिरा, लाडू, थालीपीठ, खीर, भाकरी असे विविध पदार्थ तयार केले जातात. ८. **दिवाळी** : दिवाळी किंवा दीपावली ही महाराष्ट्र तसेच भारत देशातील सर्वात मोठा सण आहे. या सणाला मातीचे दिवे ओळीने लावले जातात. दिवे लावणे हे आंतरिक प्रकाशाचे प्रतीक आहेत. या सणाला अनेक पदार्थ बनविण्याची तसेच देवाणघेवाण करण्याची प्रथा आहे. या काळात थंडीने जोर धरलेला असतो त्यामुळे शरीराला उष्णता देणारे पदार्थ जसे की ज्वारीच्या पिठाच्या चकल्या, बाजरी भरडून उसळ किंवा खिचडी, बाजरीची भाकरी, बाजरीचे दिवे इत्यादी पदार्थ बनवले जातात. या शिवाय काही फराळाचे पदार्थ जसे की चिवडा, लाडू, अनारसे, पुरण पोळी करण्याची देखील प्रथा आहे. ९. **सट आणि नागदिवे** : मार्गशीर्ष महिन्यातील प्रतिपदेला खंडोबाचे नवरात्र बसते. हे फक्त सहा दिवसांचे असते म्हणून याला षडरात्रोत्सव असेही म्हणतात. पंचमीच्या दिवशी नागदिवे हा सण साजरा केला जातो. या दिवशी अनेक घरात बाजरीच्या पीठाचे दिवे बनवतात आणि हे वाफवून घेतात. हे दिवे कुस्करून बारीक करून यात गुळ आणि दुध घालून नैवेद्य दाखवतात. तर काही भागात कुटुंबातील प्रत्येक सदस्याच्या नावाने एक गोड पदार्थ नैवेद्य दाखवून करून दिवे लावले जातात. षष्टीच्या दिवशी कुलाचार करतात. या दिवशी नव्या कांद्याचे भरीत किंवा वांग्याची भाजी आणि बाजरीच्या भाकरीचा खंडोबाला नैवेद्य अर्पण करतात. महाराष्ट्रातील डोंगराळ आणि आदिवासी भागात नाचणीलाच कणसरी माता असेही म्हणतात. कारण या भागात नाचणीचे पिक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. आदिवासी भागात आजही या धान्याची कापणी केल्या नंतर याच्या लोम्ब्याची पूजा केली जाते व या पासून केलेल्या पदार्थांचा नैवेद्य अर्पण केल्या जातो.

अशा प्रकारे जे पिकते तेच देवाला अर्पण करून सेवन करण्याची प्रथा होती. ती आता लोप पावत असून

याच संस्कृतीचे जतन करणे पौष्टीक्तेच्या दृष्टीने आणि प्रकृती स्वास्थ्यासाठी आवश्यक आहे. भरडधान्ये शरीरासाठी अत्यंत पोषक असून त्यात विविध प्रकारची पौष्टिक अन्नद्रव्ये मुबलक प्रमाणात असतात. यात तंतुमय पदार्थाचे प्रमाण जास्त असून पचनासाठी हलकी असतात. ही धान्ये सेवन करण्याचा विचार आपल्या पूर्वजांनी नक्कीच केला होता. तो आता आरोग्य पूर्ण जीवनासाठी पुन्हा सर्वानीच करायला हवा.

## वधू पाहिजे

* **शशांक सदानंद धामणकर.** जन्म तारीख : २८.०८.१९८३, जन्म वेळ : सकाळी १०.२०, शिक्षण : B. E. Mechanical, नोकरी : B. E. Mechanical वार्षिक उत्पन्न : ९.५ लाख, ब्राह्मण पोटशाखा : कऱ्हाडे ब्राह्मण, गोत्र : आग्नरस, रक्तगट : O+ve, उंची : ५.८, वर्ण : सावळा, जन्म स्थळ : गोरेगाव (मुंबई), बांधा : मध्यम, जन्म-लग्न कुंडली : रास : मेष, गण : देव, नाडी : आद्य, चरण : प्रथम, गोत्र : आग्नरस, नक्षत्र : अश्विनी, कौटुंबिक माहिती : वडिलांचे नाव : श्री. सदानंद विश्वनाथ धामणकर, संपर्क क्रमांक : ९८९३६२७३०२ / ९२७०९९५१६३ / ७३७८३०७२७०, अपेक्षा : अनुरुप, पदवीधर, कोणत्याही ब्राह्मण शाखेची चालेल, नोकरीस प्राधान्य.
* **पुष्कर दिलीप मेहुणकर.** जन्म तारीख : ०८.०१.१९९०, ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र : हरीतस, उंची : ६.१, वर्ण : गोरा, शिक्षण : १२ वी पास (बी.सी.ए. दुसरे वर्ष), व्यवसाय : शेअर मार्केट, डे ट्रेडींग, वार्षिक उत्पन्न रु. ३ लाख, अपेक्षा : मनमिळावु, नोकरी असलेली चालेल, संपर्क क्रमांक : ९८६९४१३०८६, ९८६९४६९१६१.

## मध्यवर्ती संस्थेस देणगी

१) श्री. प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी (कार्याध्यक्ष, अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ) यांनी वाढदिवसानिमित्त रु. ११,०००/- (माहे डिसेंबर २०२३)

२) श्री. श्रीकृष्ण जोशी संथा वर्ग, दादर यांचेकडून रु. ११,०००/- (माहे जानेवारी २०२४)

३) श्री. कृष्णाजी रंगनाथ जगदाळे यांचेकडून रु. १२,०००/- (माहे जानेवारी २०२४)


यांनी अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ करीत असलेल्या सामाजिक कार्यास देणगीचा धनादेश देऊन संस्थेबद्दल आपुलकी आणि कृतज्ञता व्यक्त केली आहे. मध्यवर्ती मंडळास दिलेल्या या देणगीबद्दल आम्ही आभारी आहोत.

## आजीव सभासद माहे जाने २०२४

१) श्री. प्रमोद धरणीधर देव, ओझर, पुणे, २) श्री. श्रीपाद ओंकार भांबोरीकर, डोंबिवली, ३) सौ. शामल राजेंद्र देव, पुणे, ४) सौ. रेणुका अमेय माईनणकर, दादर, मुंबई, ५) श्री. अच्युत मोरेश्वर भोसेकर, ठाणे, ६) सौ. जाई निलेश जोशी, ठाणे, ७) सौ. मदुरा निलेश डोईफोडे, ऐरोली, नवी मुंबई, ८) श्री. निलेश मधुकर डोईफोडे, ऐरोली, नवी मुंबई, ९) श्री. दिलीप सखाराम मेहुणकर, कांदिवली, मुंबई, १०) श्री. हर्षल प्रभाकर देशपांडे, हातकणंगले, कोल्हापूर, ११) श्री. रवी जोशी, पुणे, १२) सौ. वर्षा रवी जोशी, पुणे, १३) श्री. जयंत भगवान सुरत्राण, पुणे, १४) श्री. केदार किरण तेलंग, वडोदरा, गुजरात, १५) श्री. जयप्रकाश गणेश देशपांडे, मुंबई, १६) सौ. लीना जयप्रकाश देशपांडे, मुंबई, १७) श्री. रवींद्र रामचंद्र राव देशमुख, ठाणे, १८) सौ. हर्षदा मुकुंद पांडे, ठाणे, १९) श्री. श्रीराम गणेश भालेराव, ठाणे, २०) श्री. राजेंद्र पुरुषोत्तम दिंडोरकर, वडोदरा (गुजरात)


# अभिनंदन

## श्री. राम नाईक



श्री. राम नाईक यांना पद्मभूषण सन्मानाने गौरविण्यात आले. मागील पाच लोकसभा निवडणूकीत महाराष्ट्र राज्यातील उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातून सतत लोकसभेवर निवडून गेलेले मा. स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात पेट्रोलियम मंत्री राहीलेले सन २०१४ पासून उत्तरप्रदेश राज्याचे राज्यपाल असलेले श्री. राम नाईक यांना भारत सरकारने पद्मभूषण पुरस्काराने गौरविले आहे. १६ एप्रिल १९३४ रोजी आटपाडी जिल्हा सांगली येथे त्यांचा जन्म झाला. वयाच्या ३५ व्या वर्षी त्यांनी आपली नोकरी सोडून सक्रीय राजकारणात आणि समाजकारणात प्रवेश केला. अशा कर्तुत्ववान व सामाजिक कार्यकर्त्याला पद्मभूषण पुरस्काराने गौरविणे हा समाजाचा आणि ज्ञातिचाही गौरव आहे. श्री. राम नाईक यांचे त्रिवार अभिनंदन. श्री. राम नाईक हे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून लवकरच त्यांचा गौरव करण्याचा मध्यवर्ती संस्थेचा मानस आहे.

## मा. श्री. राजदत्त यांना पद्मभूषण



गेली ४ दशके मराठी चित्रपट सृष्टी गाजवलेल्या, चित्रपट सृष्टी हे फक्त मनोरंजनाचे माध्यम नसून शिक्षणाचे माध्यम आहे हे लोकांच्या मनावर ठसविणाऱ्या मूळ नाव दत्तात्रय अंबादास मायाळू यांचा जन्म धामणगाव, जिल्हा अमरावती / वर्धा येथे झाला. तरुण भारत पुणे येथून पत्रकारीता करीत नागपूर युनिर्व्हसिटीपर्यंत लेखातून पत्रकारीता करण्यास सुरुवात केली. लहान मुलांच्या चांदोबा या मासिकाच्या संपादकिय विभागात देखील त्यांनी काम केले. बेळगाव येथील कुणकुणभी या गावी पोतृगिजाचा झेंडा काढून तिरंगा फडकावणाऱ्या पुणे गोवा मुक्ती संग्रामात सक्रीय राहीलेल्या श्री. राजदत्त यांना नुकतेच पद्मभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. शापित, पुढचं पाऊल, सर्जा सारख्या चित्रपटाच्या निर्मितीला फिल्मफेअर पुरस्कार मिळविणारे राजदत्त यांनी राष्ट्रभक्ती, सामाजिक प्रश्नाची तळमळ आणि चिंतनाला चालना देणारे अनेक चित्रपट दिग्दर्शित केलेत. तसेच गोट्या सारख्या सुप्रसिद्ध मालिकेचे दिग्दर्शन ही केले आहे. राजदत्त यांनी नुकतीच वयाची ९२ वर्षे पूर्ण केली आहेत. दिग्दर्शक आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री. राजदत्त यांना तीन वेळा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, आठ वेळा राज्यशासनाकडून सर्वोत्कृष्ठ चित्रपटाबद्दल प्रथम पुरस्कार मिळविणारे ऋषीतुल्य दिग्दर्शक आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, स्वातंत्र्य सेनानी आणि कट्टर स्वयंसेवक असलेल्या श्री. दत्तात्रय अंबादास मायाळू उर्फ राजदत्त यांना भारत सरकारने पद्मभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. गेल्या दोन वर्षापूर्वी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण पूणे संस्थेने त्यांना ऋग्वेद पुरस्काराने गौरविले होते. अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी आणि श्री. आनंद कुलकर्णी यांनी श्री. राजदत्त यांच्या निवासस्थानी जावून त्यांचे अभिष्टचिंतन केले. श्री. राजदत्त यांचे मनापासून अभिनंदन. लवकरच मध्यवर्ती संस्थेमार्फत श्री. राजदत्त यांचा गौवर करण्याचा संस्थेचा मानस आहे.

*With*
*Best*
*Compliments*
*From*



# SANGRAM ENTERPRISES

**PHARMACEUTICAL DISTRIBUTORS**

**VILAS JOSHI I SANGRAM JOSHI I SOUMITRA JOSHI**

**: Office :**

Apollo, A-3, Basement,
Bajiprabhu Deshpande Marg,
Vishnu Nagar, Naupada,
Thane (West) 400602
Tel. : 25408561 / 25408565

Best Wishes From

Reg. No. AR3/RSR/UOG/22952/96-97

# SAMARTH

## URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD., BELGAVI.

**RC NAGAR BRANCH:**
"Bhagirathi" R.S.No. 731/D-2,
C Scheme, Channamma Nagar
Main Road, Belagavi -06
Phone: 0831-2443161

**TILAKWADI BRANCH:**
CTS. No. 87/B,
Mangalwar Peth, Tilakwadi,
Belagavi -06
Phone : 0831-2430357

**SHAHAPUR BRANCH:**
CTS 1103, Ground Floor,
Bichu Galli, Shahapur
Belagavi-03
Phone: 0831-2431257

**KHANAPUR BRANCH:**
1524/A6, Mannerikar Building
Beside State Bank,
Belagavi Goa Road, Khanapur
Mob: 6363090655

**Unique Deposit Scheme With Attractive Rate of Interest**

**Kalpataru Deposit Double in 84 Months**

**HEAD OFFICE:**
"Samarth Sadan", Gurukrupa Complex, 1st Floor, 1513, Maruti Galli, BELAGAVI-01
Phone: 0831-2431357, 2403968, 4202100



**Ajay A. Sunalkar**
Chairman

| AKSHAY DEPOSIT* | |
|---|---|
| 46 Day to 180 Days | 6.00% p.a. |
| 181 Days to 364 Days | 6.50% p.a. |
| 1 Year | 8.00% p.a. |
| 2 Years | 9.00% p.a. |
| 3 Years | 10.00% p.a. |
| Senior Citizen Extra 1% (1,2,3 Years) | |



**Abhay V. Joshi**
Vice Chairman

**BOARD OF DIRECTORS**

Vinayak G. Joshi
Pradeepkumar G. Kulkarni
Mrs. Chaya N. Joshi
Arvind S. Kulkarni
Ganapat A. Kulkarni
Raghavendra S. Kesnur (Secretary)

Mrs. Sunanda C. Altekar
Anil V. Bhandari
Umesh D. Sunagar
Parashuram M. Kamble
Ashok H. Pujeri
Mrs. Gouri Bidi (General Manager)

*Terms & Conditions Apply

**R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

## श्रीरामरक्षा पठण अभियान



Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH